# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १५३ वा गुरूवार दि.०९ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# सुषमा अंधारे यांनी ट्वीट केलेल्या व्हीडीओमुळे राजकारणात खळबळ

पुणे : शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी 'एक्स'वर (ट्वीटर) एक व्हीडीओ ट्वीट केला आहे. या व्हीडीओत पोलिसांची एक गाडी दिसत आहे. या गाडीत कैद्यांना काहीतरी पाकिटे दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुषमा अंधारे यांनी या व्हीडीओवरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली आहे. कोर्टातून येरवडा कारागृहात कैद्यांना घेऊन जाणा-या पोलिसांच्या गाडीत कैद्यांना पाकिटे वाटल्याचा आरोप सुषमा अंधारे यांनी केला आहे. ''उठा उठा देवेंद्रजी पोलिसांची गाडी थांबली. पुन्हा एकदा गृहखात्याची अब्रू चव्हाट्यावर आली', असे म्हणत सुषमा अंधारे यांनी फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. हा व्हीडीओ पुण्यातील जेल रोडचा आहे, असे सुषमा अंधारे यांनी स्पष्ट केले आहे.''कसली सुरक्षा, कसला बंदोबस्त? आधी पोलिसांशी हळूच निर्जनस्थळी कसली पाकीटं असा सवाल केला आहे. सुषमा प्रतिक्रिया दिली. यांच्यावर निशाणा गृहखाते आहेत. तुम्हाला



हितगुज की देवघेव? मग कैद्यांची गाडी थांबवून ही पुरवली जात आहेत?'', सुषमा अंधारे यांनी ट्वीटमध्ये अंधारे यांनी या विषयावर यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस साधला. 'देवेंद्र फडणवीस सांभाळण्यात अपयशी ठरले संभाळता येत नसेल तर राज्याचं गृहखातं माझ्याकडे द्या', असे सुषमा अंधारे म्हणाल्या.राज्याचे गृहखाते काम करण्यासाठी कमी : धंगेकर सुषमा अंधारे यांच्या ट्वीटवर काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'पोलिस पैसे घेत आहेत हे काय नवीन नाही. राज्याचे गृहखाते काम करण्यासाठी कमी पडत आहे. यांची भाषणं खोटी आणि आश्वासने देखील खोटीच', अशी टीका रवींद्र धंगेकर यांनी केली.जेलमध्ये बसलेल्या बगलबच्च्यांसाठी सुविधा : नाना पटोलेंची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीदेखील यावर प्रतिक्रिया दिली. ''सुषमा अंधारे यांनी काही नवीन ट्वीट केलेलं नाही. जेलमध्ये बसलेल्या बगलबच्च्यांसाठी सुविधा मिळत आहे. हे फक्त येरवडाबद्दल नाही. हे गुन्हेगार आणि माफिया यांना संरक्षण देणारं सरकार आहे'', अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पंडितप्रवर होते !

लातूर/ प्रतिनिधी :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजन्म विद्यार्थी म्हणून राहिले. त्यांनी जगातील कोलंबिया विद्यापीठ,लंडन स्कूल ाफ इकॅनॉमिक्स तथा ग्रेज इन अशा ख्यातकीर्त विश्वविद्यापीठातून अखंड ज्ञानसाधना केली. विश्वप्रसिद्ध बॉन विद्यापीठातूनही ज्ञानसंपादन करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली . असंख्य विद्याशाखेतील विद्या संपादन करून ते ज्ञानाचे सर्वोच्च शिखर बनले , असे प्रतिपादन ड. राजेंद्र लातूरकर यांनी केले . सात नोव्हेंबर हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळाप्रवेश दिन म्हणून सर्वदूर सुपरिचित आहे. या दिनाचे औचित्य साधून श्रीशैल मल्लिकार्जून विद्यालयात आयेजिण्यात आलेल्या छोटेखानी समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एन. गायकवाड हे उपस्थित होते.

कार्यक्रमारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. अतिथींच्या यथोचित स्वागतानंतर प्रमुख कार्यक्रमाला आरंभ झाला. आपल्या भाषणात पुढे बोलताना ड. राजेंद्र लातूरकर म्हणाले की,डॉ. बाबासाहेब




आंबेडकर हे बहुप्रसव प्रतिभा लाभलेले विद्वान होते . समाजशास्त्र, राज्यशास्त्र , मानववंशशास्त्र , अर्थशास्त्र ,विधिशास्त्र, भाषाशास्त्र, कृषीशास्त्र, इतिहास, संशोधन, अशा असंख्य ज्ञानशाखांत त्यांनी मुक्त अवगाहन केले . ते ऊर्जा व पाटबंधारे मंत्री होते. ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होते. ते पत्रपंडित होते. त्यांनी आपल्या जीवितकाळात प्रायः मूकनायक, बहिष्कृत भारत , जनता व प्रबुद्ध भारत अशी चार पत्रे आर्थिक झळ सोसून चालवली .डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या मूकनायकाने बहिष्कृत भारतातील जनतेला प्रबुद्ध भारताचे दर्शन घडवले , असे म्हणूनच डॉ. गंगाधर पानतावणे यांनी लिहिले आहे. एवढेच नव्हे , तर ते शिल्पकार,चित्रकार ,कोशकार ,संगीतकार, वास्तुविशारद ,साहित्यकार व कुशल संसदपटू होते. गोलमेज परिषद व देशभर प्रबोधनाप्रीत्यर्थ विविध प्रसंगी केलेल्या भाषणांचे अनेक खंड प्रसिद्ध झालेले आहेत .अध्ययन, अध्यापन , भाषणे व लेखनातून त्यांनी निर्मिलेली ग्रंथसंपदा म्हणजे ज्ञानांचे प्रचंड भांडारच होय, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एन. गायकवाड यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू विविध उदाहरणांद्वारे उलगडून दाखवले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्ही. व्ही. व्हत्ते यांनी केले . पी. डी. सुलाखे यांच्या आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. बाबासाहेबांच्या शाळाप्रवेश दिनानिमित्ताने श्रीशैल मल्लिकार्जून विद्यालयात बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आयेजिलेल्या छोटेखानी समारंभात लातूर जिल्हा व सत्र न्यायालयातील विधीज्ञ सचिन कांबळे ,एस. बी. आय. बँक असेशिएट परमेश्वर गायकवाड, पी. डी.सुलाखे, व्ही. व्ही. व्हत्ते,व्ही. पी. कावळे व विद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांची प्रमुख उपस्थिती होती.

# माजी नौदल अधिकाऱ्यांच्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध भारताने दाखल केले अपील

नवी दिल्ली : भारतीय नौदलाच्या आठ माजी अधिकाऱ्यांना गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अटक करण्यात आली होती आणि गेल्या महिन्यात त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यांच्यावर हेरगिरी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी गुरुवारी सांगितले की, भारताने कतारमधील आठ माजी भारतीय नौदल अधिकाऱ्यांच्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध अपील दाखल केले आहे. भारत कतार प्रशासनाशी संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितले. भारत सरकारने त्यांच्या बचावासाठी कतार न्यायालयात दाद मागितली आहे. भारताने नौदलाच्या



आठ माजी अधिकाऱ्यांना जी फाशीची शिक्षा सुनावली त्याचा पुनर्विचार करण्यासाठी हे अपील दाखल केले आहे.साप्ताहिक पत्रकार परिषदेत बागची म्हणाले की, या प्रकरणाची माहिती अद्याप उपलब्ध नाही. मात्र, ८ नोव्हेंबरला या भारतीयांना भेटण्यासाठी कॉन्सुलर ऍक्सेस देण्यात आला. निवाडा गोपनीय आहे आणि तो फक्त कायदेशीर टीमसोबत शेअर करण्यात आला आहे. आम्ही आता पुढील कायदेशीर प्रक्रिया पाहत आहोत. बागची म्हणाले की, आम्ही (माजी नौदलाच्या अधिकार्यांच्या) कुटुंबीयांच्या संपर्कात आहोत.परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी दिल्लीत या कुटुंबांची भेट घेतली होती. आम्ही सर्व शक्य कायदेशीर आणि कॉन्सुलर मदत करत राहू, असे ते म्हणाले होते. या माजी अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली तेंव्हा ते दहरा ग्लोबल टेक्नॉलॉजीज आणि कन्सल्टन्सी सर्व्हिसेससाठी काम करत होते. ही एक खाजगी कंपनी आहे जी कतारच्या सशस्त्र दलांना प्रशिक्षण आणि संबंधित सुविधा पुरवते.

# आमचे लष्करी शस्त्रे परत करा

मॉस्को : रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या काही महिन्यांपासून युद्ध सुरू होते. आता रशियाने पाकिस्तानच्या अडचणीत वाढ केली आहे. युक्रेनसोबत दीर्घकाळ चाललेल्या युद्धामुळे रशियाही कठीण परिस्थितीत आहे. त्यामुळेच कठीण परिस्थितीने वेढलेल्या रशियाने आता आपला तणाव कमी करून लष्करी शस्त्रे परत मिळवण्याच्या प्रयत्न आपल्या पूर्वीच्या संरक्षण सहयोगी देशांकडे मोर्चा वळवला आहे.आपली लष्करी शस्त्रे परत मिळवण्यासाठी रशियाने पाकिस्तानकडे मोर्चा वळविला आहे, जो अनेक वर्षांपासून रशियन लष्करी उपकरणे खरेदी करत आहे. रशियाने पाकिस्तानला त्यांच्या हेलिकॉप्टरचे इंजिन परत करण्यास सांगितले आहे. रशियाने पाकिस्तानला त्यांचे हेलिकॉप्टर इंजिन परत करण्यास सांगणे हे सूचित करते की, रशियाला त्याच्या लष्करी प्रयत्नांमध्ये त्वरित मदतीची आवश्यकता आहे, जे आंतरराष्ट्रीय लष्करी युती आणि संरक्षण उद्योगावरील संघर्षाचे व्यापक परिणाम दर्शवते. युक्रेन युद्धाचा हवाला देत रशियाने पाकिस्तानकडून ही मागणी केली आहे.

# नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर तरुणांचा मोठा विश्वास- आ. कराड

## आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्र वाटप

लातूर : - युवा मतदारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वावर तरुणांचा विश्वास असल्याने या सर्व तरुणांना भाजपाच्या प्रवाहात घेवून लातूर ग्रामीण मतदार संघातून लोकसभा निवडणूकीत भाजपा उमेदवाराला पन्नास हजाराहून अधिक मताधिक्य मिळावे यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर तालुका भाजयुमोच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप प्रसंगी केले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात रेणापूर तालुका भाजयुमोच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्राचे वाटप भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, लातूर ग्रामीण अध्यक्ष अनिल भिसे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजना समिती लातूर तालुका अध्यक्ष वैभव सापसोड, रेणापूर तालुका अध्यक्ष वसंत करमुडे, रेणापूर तालुका भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष अमर चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लातूर ग्रामीण मतदार संघात केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून विकासाच्या अनेक योजना मोठया प्रमाणात राबविल्या जात असून शासनाच्या विविध योजनांची माहिती गरजू, गोरगरीब सर्व सामान्यांना पर्यंत पोहंचवावी असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, येणाऱ्या लोकसभा, विधानसभेसह स्थानिक स्वराज्य






संस्थेच्या निवडणूकीसाठी जिद्दीने जोमाने काम करुन भाजपाच्या उमेदवाराला मताधिक्य मिळवून देण्यासाठी भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घ्यावी असे आवाहन केले तर तालुका अध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे यांनी भाजयुमोच्या कार्यकर्त्यांवर मोठी जबाबदारी असल्याने पक्षाचे सर्व कार्यक्रम प्रभाविपणे यशस्वी करावेत असे सांगितले. भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजयुमोचे नूतन पदाधिकारी उपाध्यक्ष हाजी सजन शेख, शरद राऊतराव, ॲड प्रसाद माने, काशिनाथ सांगळे, भगवान करमुडे, अविनाश कापसे, प्रवीण शिंदे, विनोद रायमुळे, गोकुळ सुरवसे, कोंडीबा केंद्रे, सरचिटणीस - दीपक पवार, अविनाश रणदिवे, संतोष घुले, दयानंद बानापुरे, योगेश पनगुले, अमर माने, नरेश चपटे, अमोल बिडवे, चिटणीस - महेश सुडे, सतीश पाटील, महादेव उगिले, आबासाहेब शिरसाट, संगमेश्वर जमदरे, दीपक मुंडे हनुमंत साळुंखे कोषाध्यक्ष जयराम जाधव यांच्यासह इतर कार्यकारिणीतील सदस्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. यावेळी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# जत्रेतील रेवड्या-बत्तासे

सर्वांच्या सर्व गरजा पूर्णपणे भागतील, अशी क्षमता कधीच नसते, हा अर्थशास्त्रातील पहिला धडा; तर तो धुडकावणे हा राजकारणातला पहिला धडा!लोकसभेच्या चार महिन्यांवर येऊन ठेपलेल्या निवडणुकांची 'रंगीत तालीम' म्हणून बघितले जात असलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या पहिल्या फेरीचे मतदान आज (मंगळवारी) छत्तीसगडमधील २० मतदारसंघांत आणि मिझोराममध्ये होत असून प्रचारात भारतीय जनता पक्ष तसेच काँग्रेस या दोन्ही प्रमुख प्रतिस्पर्ध्यांनी 'रेवड्यांची बोली'च लावल्याचे दिसत आहे. आश्वासने देण्यात कृपणता कशाला ठेवा, असा विचार करून त्यांचा अक्षरशः वर्षाव केला जात आहे. हे असले लोकानुनयी राजकारण आणि देशाचे अर्थवास्तव यात मोठी दरी आहे, पण लक्षात कोण घेतो? यावेळच्या आश्वासनांचे स्वरूप आणि त्यासंबंधीच्या घोषणा पाहता एखाद्या लिलावा-चेच दृश्य डोळ्यांसमोर येते.मतदारांपुढे राजकीय पक्ष जणू बोली लावत आहेत! काँग्रेसने १८ लाख गरिबांना घरे देण्याचे आश्वासन छत्तीसगडमध्ये देताच, भाजपने तो आकडा ५० हजारांनी वाढवला! काँग्रेसने तेंदू पत्ता उत्पादकांना वर्षाला चार हजार रुपये 'बोनस' देण्याची घोषणा करताच, भाजपने साडेचार हजारांचा पुकारा केला. कमाल झाली ती तांदूळखरेदीच्या आश्वासनाच्या वेळी. काँग्रेसने शेतकऱ्यांकडून चार हप्त्यांत मिळून २० क्विंटल तांदूळ तीन हजार रुपये दराने खरेदी करण्याची घोषणा केली, तर तत्काळ भाजपने एकाच वेळी २१ क्विंटल तांदूळ आणि तोही ३१०० रुपये दराने खरेदी करण्याची ग्वाही मतदारांना दिली. मात्र, राजकीय पक्षांच्या रेवडीबाजीबद्दल पूर्वी तिखट शब्दांत नाराजी व्यक्त करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्याच पक्षाकडून होत असलेल्या रेवडीबाजीला आवर घालताना दिसत नाहीत. शेतकरी कर्जमाफी, स्वस्त दरात गॅस सिलिंडर, महिलांना अनुदान आदी नेहमीचे विषय दोन्ही पक्षांच्या अजेंड्यावर आहेतच! पंतप्रधान गरीब अन्नकल्याण योजना' ही कोरोना काळात सुरू झाली. तब्बल ऐंशी कोटी लोकांना रेशनवर मोफत धान्य या योजनेमार्फत दिले जाते. या योजनेचे स्वरूप, व्याप्ती मोठी आहे. ती चालू ठेवावी किंवा नाही, यावर मतभेद होऊ शकतात. पण प्रश्न असा की, त्यासंबंधीचा महत्त्वाचा निर्णय पंतप्रधानांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत करणे कितपत सयुक्तिक आहे? निवडणुकांची विधिवत घोषणा होऊन, आचारसंहिता जारी झाल्यावर अशी कोणतीही अधिकृत सरकारी घोषणा करता येत नाही. मात्र,पंतप्रधानांच्या या घोषणेनंतरही निवडणूक आयोग स्वस्थचित्त आहे! या योजनेला पाच वर्षे मुदतवाढ मिळाली आहे. योजनेसाठी येणाऱ्या अंदाजे दोन लाख कोटी रुपयांच्या खर्चाची तरतूद सरकार कशी करणार, हेही स्पष्ट करायला हवे. दुसरा मुद्दा म्हणजे लोकांची क्रयशक्ती वाढविण्यास पोषक परिस्थिती निर्माण करणे, हे सरकारचे मुख्य काम असते. जर ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य इतका दीर्घकाळ द्यावे लागत असेल तर ही त्या बाबतीतील अपयशाची कबुलीच नव्हे काय?या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील ९०पैकी अवघ्या २० मतदारसंघांत पहिल्या फेरीत मतदान होणार आहे. या २० पैकी १० मतदारसंघ हे नक्षलग्रस्त विभागातील आहेत. या राज्यात गेल्या निवडणुकीपूर्वी सलग १५ वर्षे भाजपची सत्ता होती आणि रमणसिंह यांचा आ-वाज दुमदुमत होता. गेल्या निवडणुकीत चमत्कार घडला आणि भूपेश बघेल यांनी ९० पैकी ६८ जागा जिंकून राज्य काँग्रेसला मिळवून दिले. तेव्हा भाजपच्या वाट्याला अवघ्या १५ जागा आल्या होत्या. मात्र, आता भाजप ते पुन्हा खेचून घेण्यासाठी सर्वशक्तिनिशी प्रयत्न करत आहे. काँग्रेसचे पारडे आज जरी वरचढ दिसत असले, तरी अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष मध्य प्रदेशप्रमाणे येथेही अडथळा म्हणून रिंगणात आहेच. त्याशिवाय,अन्य अनेक छोटे-मोठे गट आणि समूहही मतविभाजनाचे काम करण्यासाठी उत्सुक असून, ते टाळण्यासाठी काँग्रेस शिकस्त करत आहे. भाजप-ने आपले सारे लक्ष राज्यातील ४५ टक्के ओबीसींवर केंद्रित केले असून, त्यात ३० टक्क्यांनी असलेला साहू समाज भाजपबरोबर असल्याचे सांगण्यात येते. एकीकडे रेवडीबाजी आणि दुसरीकडे परस्परांवर भ्रष्टाचाराच्या आरोपांची राळ उडविणे असे स्वरूप प्रचाराला आले आहे. 'महादेव प'च्या प्रकरणातील कथित भ्रष्टाचाराच्या आरोपावरून वातावरण तापले आहे. हा आरोप होताच लगोलग केंद्र सरकारने या सट्टेबाजारी पवर बंदीही घा-तली.त्यानंतर लगेचच राहुल गांधी हे 'हर हर महाद-व!' असा गजर करत केदारनाथच्या दर्शनाला गेले! एकूणच लोकांच्या मूलभूत प्रश्नांना बगल देऊन निव्वळ टीव्हीच्या छोट्या पडद्यासाठीच ही चमकोगिरी आहे, हे आता लोकांना कळून चुकले आहे. त्यामुळे छत्तीसगडची जनता कोणाला कौल देते याबाबत कमालीची उत्सुकता आहे. या पाच राज्यांमधील मिझोराम या एकमेव राज्यात ना भाजपला सत्ता मिळणार आहे, ना काँग्रेसला. त्यामुळे या दोन्ही पक्षांनी या राज्यातील प्रचाराकडे फारसे लक्ष दिलेले नाही. शिवाय,या राज्यातून अवघे दोनच खा-सदार निवडून जात असल्याने तेथील जनमतकौलाचा केंद्रातील राजकारणावर काहीच परिणाम होत नाही. मिझोरामबाबतचे औत्सुक्य हे भाजप तसेच काँग्रेस निकालानंतर कोणत्या स्थानिक पक्षाबरोबर जातात काय, एवढ्यापुरतेच मर्यादित आहे. महिनाअखेरपर्यंत अन्य राज्यांत प्रचाराचा गदारोळ सुरूच राहणार आहे. तेव्हा तरी काही खऱ्या प्रश्नांची वा धोरणांची चर्चा होते की फक्त 'रेवडीबाजीची बोली' लावण्याचाच खेळ सुरू राहतो, ते बघावयाचे.

# युरोपियन युनियन 'उजव्या' वळणावर?

१९८० च्या दशकात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपर्यंत आणि १९९३ मधील 'ईयू'च्या स्थापनेपर्यंत या बदलाच्या शक्यतेची मुळे जातात.

संजीव चांदोरकर१९८० च्या दशकात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपर्यंत आणि १९९३ मधील 'ईयू'च्या स्थापनेपर्यंत या बदलाच्या शक्यतेची मुळे जातात. 'ब्रेग्झिट'नंतर युरोपीय संघात किंवा 'युरोपियन युनियन'मध्ये (यापुढे 'ईयू') आता २७ सभासद देश आहेत. या सर्वच देशांत संसदेची मुदत संपल्यावर किंवा मुदतपूर्व निवडणुका नियमितपणे होत असतात. यापैकी अनेक देशांत, दुसऱ्या महायुद्धापासून अलीकडेपर्यंत, केंद्रातील राजकीय सत्ता आलटूनपालटून राजकीय मध्यिबदूच्या उजवीकडे किंवा डावीकडे झुकलेल्या राजकीय पक्षांमध्ये फिरत असायची. उदा. फ्रान्समध्ये रिपब्लिकन-समाजवादी, जर्मनीत ख्रिश्चन डेमोक्रॅट्स-सोशल डेमोक्रॅट्स, स्पेनमध्ये पीपल्स पार्टी-सोशॅलिस्ट वर्कर्स पार्टी इत्यादी. गेल्या काही वर्षांतील या देशातील संसदीय निवडणूक निकालांवर नजर टाकली तरी हे लक्षात येते की तेथे संथपणे पण ठाम बदल होत आहेत.

या बदलांची काही गुणवैशिष्ट्ये दिसतात; अर्थात जी प्रत्येक देशात तशीच्या तशी सापडतीलच असे नाही- (१) गेली अनेक दशके देशाची सत्ता वाटून घेणाऱ्या राजकीय पक्षांचे अस्तित्व नगण्य होऊ लागले आहे उदा. २०२२ मधील फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्ष निवडणुकांत रिपब्लिकन आणि समाजवादी पक्षाला अनुक्रमे ५ आणि दोन टक्के मते पडली. (२) अनेक छोटे-मध्यम, मोठे राजकीय पक्ष-संघटना उदयाला आल्या आहेत. एका अहवालाप्रमाणे गेल्या ३० वर्षांत ८००; त्यातील अनेक तरुण वयाच्या नेत्यांनी स्थापन केलेले! एवढेच नाही तर स्थापनेपासून अतिशय कमी कालावधीत त्यांनी सत्ता मिळवली आहे. उदा. फ्रान्समध्ये इमान्युअल मॅक्रोन (जन्म १९७७) यांचा रेनेसान्स, इटलीच्या जॉर्जिया मिलोनी (जन्म १९७७) यांची ब्रदर्स पार्टी. (३) अनेक देशांत कडव्या उजव्या राजकीय शक्ती अधिकाधिक खोलवर मुळे रुजवू लागल्या आहेत. उदा. फ्रान्समध्ये नॅशनल फ्रंटच्या ली पेन यांची मते प्रत्येक राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत वाढत आहेत. जर्मनीमध्ये 'अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' हा अतिरेकी उजव्या विचारांचा पक्ष जोर पकडत आहे. एक सर्वसाधारण समज असतो की तरुण पिढी पुराणमतवादाची समर्थक नसते. काही सर्वेनुसार युरोपातील उजव्या राजकीय शक्तींच्या पाठीराख्यांमध्ये तरुण वर्ग बऱ्यापैकी आहे.ले नाहीत. त्याची मुळे १९८० च्या दशकात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपर्यंत आणि १९९३ मधील 'ईयू'च्या स्थापनेपर्यंत जातात. या देशांमध्ये नक्की काय सुरू आहे याकडे जाण्यापूर्वी 'ईयू'मधील आर्थिक ताणतणाव समजून घेऊ या.'ईयू'मधील आर्थिक ताणतणाव 'ईयू' गटाची १६ ट्रिलियन्स डॉलर्सची अर्थव्यवस्था, अमेरिका, चीननंतरची जगा-तील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. गेली अनेक दशके ठोकळ उत्प-ादनाचा वाढदर, लोकसंख्या, जननक्षम स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण वाढत नाहीये. मंदावलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये भांडवल रिचवले जात नसल्यामुळे 'ईयू'मध्ये अनेक वर्षे नकारात्मक व्याजदर ठेवावे लागले होते. यात भर पडली ती २००८ सालातील अमेरिकेतील सबप्राइम अरिष्टाच्या 'ईयू'मधील अनेक अर्थव्यवस्थांवर झालेल्या विपरीत परिणामांची. त्याला तोंड देण्यासाठी अनेक राष्ट्रांना कल्याणकारी योजनांना कात्री लावणारे अर्थसंकल्प राबवावे लागले. त्यातून शिक्षण, बालगृहे, आरोग्य, निवृत्तिवेतनासाठीच्या शासकीय योजना आवळल्या गेल्या आणि नागरिकांमध्ये असंतोष साचू लागला. याला हाताळण्यासाठी लागणारी कल्पक जनकेंद्री आर्थिक धोरणे आणि राजकीय धैर्य अनेक दशके जुन्या आणि वयस्कर नेत्यांच्या नेतृत्वाखालील मुख्य प्रव-ाहातील राजकीय पक्षांच्या आवाक्याबाहेरील होते. या राजकीय पोकळीत अनेक देशांत तरुणांनी पुढाकार घेतलेले राजकीय पक्ष स्थापन झाले. यात लक्षात घेण्याचा भाग हा की, काही देशांत



अशा त्रस्त आणि भ्रमनिरास झालेल्या समाजघटकांना नवीन डाव्या पक्षांनी संघटित करण्यात यश मिळवले तर काही देशांत नवीन कडव्या उजव्या पक्षांनी.असंतोषाची कारणे विविध आहेत; उदा राहणीमानाचे प्रश्न, ऊर्जा सुरक्षेचे प्रश्न, कुटुंबसंस्थेचा ऱ्हास होत असल्याची भावना इत्यादी. पण अनेक देशांत सामायिक आणि प्रमुख कारणे दोन - (अ) आफ्रिकेतून येणाऱ्या स्थलांतरितांबद्दल वैरभाव आणि 'ईयू'मधील नोकरशहांबद्दल तिटकारा. स्थलांतरित आणि ईयूविरोधी असंतोषउत्तर आफ्रिकी देशातून तराफे, कमी दर्जाच्या बोटींमधून 'ईयू'च्या आश्रयाला येणारे हजारो कृष्णवर्णीय स्थलांतरित प्रथम इटलीच्या किनाऱ्यावर उतरतात आणि नंतर पायी किंवा जमेल तसे इतर देशांत पसरतात. 'ईयू'मध्ये शारीरिक कामे करणाऱ्या श्रमिकांचा नेहमीच तुटवडा असतो. आफ्रिकेतून स्वतःहून येणाऱ्या या स्थलांतरितांना आश्रय दिल्यास श्रमिकांच्या तुटवडय़ाचा प्रश्न अंशतः सुटेल अशा व्यावहारिक विच-ाराने 'ईयू'च्या नेतृत्वाने त्यांच्यातील काहींना सामावून घेण्याचा निर्णय अनेक वर्षांपूर्वी घेतला. कोणत्या देशाने किती स्थलांतरित सामावून घ्यायचे याची कोटा प्रणाली राबवली. उदा. २०१५ पासून जर्मनीने १० लाख आफ्रिकन स्थलांतरितांना सामावून घेतले आहे. स्थलांतरितांचा प्रश्न मानवताव-ादी असेल, पण त्यामुळे आमच्या राष्ट्रात घरांच्या उपलब्धतेचे, शिक्षण, आरोग्य यंत्रणांवर पडणाऱ्या ताणाचे गंभीर प्रश्न तयार होतात त्याचे काय? ही सहज भावना 'ईयू' नागरिकांत घर करू लागली. उजव्या राजकीय पक्षांनी या भावनेला आपल्या शिडात भरून घेऊन आपला पाठीराखा वर्ग तयार केला.'ईयू'ची स्थापना सभासद राष्ट्रांच्या सहमतीने झाली हे निर्विवाद. पण त्या सहमतीनाम्यातून राष्ट्रांच्या अनेक सार्वभौम अधिकारांवर गदा आली. अर्थसंकल्प कसा बनवायचा, वित्तीय तूट किती ठेवायची, कशाला व किती सबसिडी द्यायची, व्याजदर किती ठेवायचे आणि किती स्थलांतरितांना सामावून घ्यायचे हे निर्णय 'ईयू' घेते असे नॅरेटिव्ह रुजू लागले. खरे तर 'ईयू'च्या संसदेत प्रत्येक सभासद राष्ट्रातील मतदार नागरिक आपला लोकप्रतिनिधी पाठवत असतात. तरीदेखील आम्हाला उत्तरदायी नसणारे नोकरशहा 'ईयू' चालवतात असा दृढ समज तयार झाला आहे. त्यात तथ्यदेखील आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर 'ईयू'मधील काही देशांमधील अलीकडच्या काळातील राजकीय घडामोडी समजावून घेऊ या.

'ईयू'मधील देशनिहाय घडामोडी 'ईयू'मधील ज्या घडामोडीची जगाने आवर्जून नोंद घेतली पाहिजे ती म्हणजे तेथे वाढणाऱ्या उजव्या राजकीय शक्ती. अपवाद पोलंडचा. अलीकडे झालेल्या संसदीय निवडणुकांत सत्तेवरील उजव्या पक्षाला दूर सारत डाव्या आघाडीने सत्ता स्थापन केली आहे. पोलंड धरून 'ईयू'मधील २७ राष्ट्रांपैकी अजून पाच राष्ट्रांत (जर्मनी, डेन्मार्क, पोर्तुगाल, स्लोव्हेनिया आणि माल्टा) डावीकडे झुकलेली सरकारे आज तरी सत्तेवर आहेत. आणि किती राष्ट्रांत आज उजव्या राजकीय विचारांचे पक्ष/ नेते प्रत्यक्ष सत्तेवर आहेत, असा प्रश्न विचारण्याऐवजी 'ईयू'मधील 'उजवे-करणा'चा वेग किती आहे, तो किती अपरिवर्तनीय आहे, असे प्रश्न विचारणे सयुक्तिक होईल.

या संदर्भातील इटली, फ्रान्स, जर्मनीमधील काही घडामोडींचे उल्लेख वर आ-लेलेच आहेत. त्याची पुनरुक्ती करत नाही. त्याशिवाय गेल्या काही महिन्यांत इतरही काही देशांचे 'उजवे-करण' होत आहे. उदा. फिनलंडमध्ये जुन्या पुराणमतवादी पक्षाने 'फिन्स' या कडव्या उजव्या गटाबरोबर सत्ता स्थापन केली. नेदरलँडमध्ये स्थलांतरितांच्या प्रश्नावर सरकार कोसळले. ग्रीसमध्ये उजव्या विचारांचे मित्सोटाकीस दुसऱ्यांदा अधिक मताधिक्याने पंतप्रधान झाले. स्पेनमध्ये उजव्या विचारांची पीपल्स पार्टी सत्तेवर आली आहे. स्विझर्लंडमध्ये उजव्या आघाडीने मताधिक्य घेतले आहे.

संदर्भबिंदू 'ईयू'मधील बदलणाऱ्या या राजकीय भूस्थरांचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. याचे प्रतिबिंब २०२४ मधील 'ईयू' संसदेच्या निवडणुकांमध्ये आणि म्हणून 'ईयू'ची सध्याची धोरणे बदलण्यात होऊ शकते. उदा. स्थलांतरितांबद्दलच्या धोरणांवर, वातावरण बदल आटोक्यात आणण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांवर, चीनबरोबरच्या व्यापारी आणि गुंतवणुकी करारांवर. अनेक उजव्या राजकीय गटांमध्ये 'नाटो'विरोधी भावनादेखील आहे. त्याचा परिणाम अर्थातच ईयू-अमेरिका संबंधांवर होऊ शकतो. 'ईयू' आणि भारताच्या राजकीय बांधकामात काही मूलभूत फरक नक्कीच आहेत. पण भाषा, संस्कृतीमधील विविधता आणि आर्थिक विकासाच्या आणि नैसर्गिक साधनसामग्रीच्या भिन्न पातळय़ा अशा निकषांवर 'ईयू'मधील सभासद देश आणि भारतातील राज्ये यांची तुलना नक्कीच होऊ शकते. अशा वैविध्याला आणि भिन्नतेला एका साच्यात जबरदस्तीने कोंबण्याच्या तीव्र प्रतिक्रिया येऊ शकतात हा मोठा धडा ईयूमधील घडामोडींकडून आपल्याला घेता येईल. लेखक आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक आहेत .

# प्रदूषण असले तरी, आम्ही फटाके वाजवण्यासाठी सज्ज आहोत !

प्रदूषणाचा कहर वाढत असल्यामुळे न्यायालयाने दिवाळीच्या काळात तीनच तास फटाके वाजवायला परवानगी दिली आहे. पण फटाक्यांची दुकाने सजली आहेत. त्यांची खरेदी विक्री सुरू आहे. बाजारात फटाक्यांची दुकाने अगदी गल्लोगल्ली दिसत आहेत. फटाक्यांच्या विक्रीच्या माध्यमातून हंगामी उत्पन्न मिळत असले तरी फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे समाजाचे नुकसान होते, त्याचे काय, असा व्यापक विचार होताना दिसत नाही. फटाके विक्रेता कोणत्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे, हे कळण्यासाठी काही ठिकाणी फटाक्यांच्या स्टॉल्सवर राजकीय पक्षांचे बॅनर लावले जातात. ते यंदाही दिसत आहेत. फटाके विक्रीतून चार लोकांना मिळणारा नफा महत्त्वाचा मानायचा की त्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे निसर्ग आणि पर्यायाने समाजाची होणारी हानी अधिक गांभीर्याने घ्यायची ? पण 'कोण कुठला समाज. आम्ही फक्त आमचाच विचार करतो. नाहीतरी प्रत्येक जण तेच करतो. मग आम्ही फटाके विक्रीच्या माध्यमातून चार पैसे मिळवले तर कोणाच्या पोटात का दुखावे ? रोजच्या गरजांच्या पूर्तीसाठी म्हणा किंवा अन्य खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले पैसे कोणी खिरापत म्हणून वाटत नसते. त्यामुळे प्रदूषण वगैरेचे उपदेश आम्ही मानत नाही', असा विचार रूढ झाला आहे.मराठी माणूस फटाके विक्रीच्या व्यवसायात अग्रस्थानी दिसतो. अन्य राज्यांतून येणाऱ्या लोकांनी उदरनिर्वाहासाठी उपाहारगृहे थाटली, भेळ - पाणीपुरीच्या गाड्या टाकल्या, भाजी - मासेही विकत आहेत. राज्याचे भूमीपुत्र म्हणवणारे व्यवसाय थाटण्यासाठी दिवाळी वाट बघत फटाके विक्रीचा स्टॉल कधी लावता येईल, घाऊक बाजारातून फटाके आणून स्थानिक ठिकाणी कसे विकता येतील, याचाच विचार करत असतात का, असा प्रश्न पडतो. दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या सायंकाळी सर्वाधिक फटाके वाजवले जातात. दिवाळीच्या अन्य दिवसांतही हमखास ते वाजतच असतात. अमुक हजार रुपयांचे फटाके आणले आहेत, याचे भूषण वाटणारे महाभागही आहेत. एका बाजूला लक्ष्मी देवीची विधीवत पूजा करायची आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्मी देवतेचे स्वागत फटाक्यांचा कचरा आणि धूर करून करायचे, ही विसंगती न वाटता तसे न करणाऱ्यांची टिंगल केली जाते. फटाके विक्रेता, फटाके वाजवणारे आणि ते न वाजवणारे असे सर्वच जण याच निसर्गातून मिळत असलेल्या प्राणवायूवर जिवंत आहेत. पण त्या निसर्गाची चिंता केवळ फटाके न वाजवणाऱ्या मंडळींना असते आणि यांनाच मूर्खात काढले जात आहे.फटाक्यांवर कायमची बंदी आणण्याचा विचार कधी होईल का, याचे उत्तर नाही असेच वाटते. प्रदूषणामुळे श्वास कोंडत आहे. पण तरीही फटाक्यांवर बंदी आणायचा सरकार पातळीवर विचारही होत नाही, याचे खरच आश्चर्य वाटते. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी फटाके बंदी येणे अशक्य वाटते. कारण निसर्गाकडे गांभीर्याने पाहण्याचा व्यापक विचार करण्याची कुवत दिसत नाही. दोन - चार वृक्ष लावताना फोटो काढले की झाले निसर्गाचे संवर्धन, असे करून निसर्ग जपता येत नाही. याची कल्पना असूनही औपचारिकतेला पर्याय नाही, असेच वागले जाते. फटाके वाजवण्यासाठी ठरावीक वेळ घालून दिली तरी त्याचे कोणीही पालन करत नाही. कारण फटाके वाजवणाऱ्या लोकांचा आणि वेळेचा दुरान्वयेही संबंध नसतो. फटाके वाजवण्याची वेळ ठरवणे ही एक औपचारिकता आहे. फटाके वाजवा पण ठराविक वेळेत, अशी भूमिका घेतली तर फटाके बंदीची डाळ शिजणे अशक्यच !फटाके वाजवण्यासाठी पैसे खर्च करण्यापेक्षा गरिबांना दिवाळीचा फराळ, नवीन कपडे इत्यादी देण्यासाठी तेच पैसे खर्च करता येतील. आपल्यामुळे कोणाची दिवाळी गोड झाली तर चांगलेच आहे, इतका साधा विचार करण्यासाठी बुद्धी चालवण्याची इच्छा नसणे यासारखा माणूसकी शून्यपणा नव्हे. बरं, कोणाला काही द्यायची नियत नसेल तर फटाके वाजवून किमान निसर्गावर आणि श्वासाशी निगडीत विकार असणाऱ्या रुग्णांवर अन्याय तरी करू नका.'लहान मुले फटाक्यांसाठी हट्ट करतात. त्यांच्यासाठी फुलबाजा, चक्र, पाऊस असे फटाके घ्यावे लागतात. ते नाही घेतले तर रडून मुलं उच्छाद करतील.' पालकांचा हा विचार पाल्याला केवळ स्वतःचाच विचार करण्यास प्रेरित करतो. एरव्ही मूल रडू लागल्यावर त्याला शांत करण्यासाठी पालक ते मागेल त्याला देतात. अगदी त्याला शांत करण्यासाठी मोबाईल, टॅब यांसारखी इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट्स दिली जातात. पण नेमके जे द्यायला पाहिजे तेच देत नाहीत. किंबहुना, अजून लहान आहे असे म्हणत त्याचा हट्ट पुरवण्यात आनंद मानतात. मुलांना बालपणापासूनच निसर्ग - सामाजिक कर्तव्य - रुग्ण यांच्याविषयी त्यांची कर्तव्ये काय आहेत, याची जाणीव करून दिली पाहिजे. मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत सांगितले की, ते त्यांच्या मनावर कोरले जाते. मुले अनुकरण प्रिय असल्याने लहानपणापासूनच त्यांच्यापर्यंत योग्य विचार पोहोचत राहाणे अनिवार्य आहे. अन्यथा वय पुढे चालले की, चांगले विचारही चुकीचे वाटू लागतात. त्याचा परिणाम काय होतो, याची प्रचिती आपण दिवाळीत वायू प्रदूषणाच्या रुपात घेतच आहोत.फटाक्यांच्या बाजारात ९५ टक्के फटाके हरित फटाके असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, या फटाक्यांपैकी अनेक फटाक्यांमध्ये 'बेरियम' हा घातक धातू आढळून आल्याचे 'आवाज फाऊंडेशन'कडून सांगण्यात आले आहे. वर्ष २०१८ पासून 'आवाज फाऊंडेशन' फटाक्यांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण आणि फटाक्यातील घटक यांच्या चाचण्या करत आहे. बेरियम या घटकावर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घालूनही हा घटक फटाक्यांमध्ये आढळल्याने 'आवाज फाऊंडेशन'ने या फटाक्यांच्या विक्रीवर निर्बंध आणले जावेत, अशी मागणी मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून केली आहे. विकार पसरवणारे घटकच उघडपणे विकले जाणे धोक्याचे आहे. पण आता ऐन दिवाळीच्या तोंडावर काय केले जाणार ?

'दिवाळीत फटाके फोडणे टाळा आणि मुखपट्टी वापरा' असे आवाहन राज्याच्या आरोग्य विभागाने केले आहे. असे आवाहन फटाक्यांच्या धुरात हरवून टाकण्याचे काम लोक कसे करतात हे समजेलच. कारण त्यांनी फटाके वाजवण्याची तयारी करून ठेवली आहे. मुखपट्टीच्या उपयोगाशी देणेघेणे नसल्याचा त्यांचा आविर्भाव आहे. फटाक्यांच्या उपयोगाने इतरांसह स्वतःचाही जीव धोक्यात आहे, हे ज्यांना जाणून घ्यायचे नाही, ते माणूस म्हणून दुसऱ्याचा विचार काय करणार?

क्षेपनभूमीवर प्रतिदिन कचऱ्याचे ढीग साचत आहेत. तेथील कचरा जाळल्यावर येणाऱ्या दुर्गंधीने अक्षरशः जीव गुदमरतो. त्यात फटाक्यांच्या कचऱ्याचा अतिरिक्त समावेश म्हणजे श्वसनाचे विकार असणाऱ्या रुग्णांच्या जखमेवर जाणीवपूर्वक मीठ चोळणे होय. फटाक्यांचा कचरा उचलण्यासाठी स्थानिक मनपा, जिल्हा परिषद यांचे स्वच्छता कर्मचारी म्हणजे रस्ते स्वच्छ करणारे हक्काचे कर्मचारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. स्वतः कचरा करायचा आणि तो साफ करण्यासाठी दुसऱ्यावर सक्तीने भार टाकायचा, हा निर्लज्जपणाचा कळस झाला.राजधानी दिल्लीसह देशाच्या विविध भागांत वायू प्रदूषण वेगाने पसरत आहे. राजधानीतील प्रदूषणाची घातक पातळी लक्षात घेता कित्येक वर्षे या काळात शाळांना सुट्टी द्यावी लागत आहे. तरीही पालथ्या घड्यावर पाणीच असे म्हणता येईल. कारण प्रदूषणाने धोक्याची पातळी गाठल्यावर तात्पुरते जागे होतात. देशाची राष्ट्रीय राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक शहरांवर प्रदूषणाची दाट छाया आहे. देशातील प्रमुख महानगरे आणि शहरांची विदारक स्थिती आहे. बेसुमारपणे वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या अन्न पदार्थविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीत रासायनिक खतांचा उपयोग होतो. त्यामुळे अन्नात कसदारपणा नाही. परिणामी माणसाची प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने अनेक आजारांनी त्याला घेरले आहे. प्रदूषित वातावरणात पिकत असलेले धान्य कसे असणार, हे सुज्ञास सांगणे न लागे.

दीपावली व्यतिरिक्त निवडणूक निकाल, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात आगमन - विसर्जन मिरवणुका, २५ डिसेंबर, ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री, नेत्यांच्या सभांच्या वेळी, तसेच विभागात त्यांच्या भेटी दरम्यान, क्रिकेट सामने, विवाहाच्या मिरवणुका इत्यादी वेळी फटाक्यांचा धुमधडका पाहायला मिळतो. दिवाळीत फटाक्यांमुळे आग लागण्याच्या दुर्घटना होणे, भाजणे, डोळ्यांना दुखापत होणे, प्रसंगी तो अवयव निकामी होणे या घटनांकडे क्षुल्लक म्हणून पाहिले जात आहे. बाका प्रसंग कोणावर कधी ओढवेल हे सांगता येत नसते. कारण त्याची कटू फळे फटाक्यांशी संबंध नसलेलेच जास्त भोगतात.

# तुम्हीही फॉलो करण्याआधी डॉक्टरांचं मत वाचा

तळीरीं घेहश्रळ उ्ळशीं: कोहली म्हणाला की, माझी करंगळी सुन्न झाली होती व हातालाही सतत मुंग्या येत होत्या. यामुळे मला रात्री झोप लागत नव्हती व प्रचंड वेदना होत होत्या. त्याला कारण होतं की.. टीम इंडियाचा हुकुमी एक्का म्हणून ओळखला जाणारा स्टार खेळाडू विराट कोहली हा त्याच्या फिटनेससाठी सुद्धा ओळखला जातो. अलीकडेच एका पॉडकास्टमध्ये भारताचा माजी स्टार युवराज सिंगने सुद्धा विराट कोहलीच्या फिटनेसचे कौतुक करत जेव्हा पासून कोहली संघाचा कर्णधार झाला तेव्हा पासून संघाच्या फिटनेसचा स्तर प्रचंड वाढला, असे म्हटले होते. विराट कोहलीने आपल्या फिटनेसचे श्रेय हे व्यायामाइतकेच त्याच्या आहाराला दिले आहे. २०१८ मध्ये, विराट कोहलीने आरोग्यासाठी आहारासंबंधित अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत शाकाहारी होण्याचे ठरवले होते. २०२० मध्ये इंग्लंडचा माजी फलंदाज केविन पीटरसनसह संभाषणाच्या वेळी, कोहलीने शाकाहार निवडण्याचे कारण ठरलेल्या त्रासांचा सुद्धा उल्लेख केला होता.कोहली म्हणाला की, २०१८ मध्ये, जेव्हा आम्ही दक्षिण आफ्रिकेला गेलो होतो, तेव्हा मला एक कसोटी सामना खेळताना सार्विकल स्पाईनचा त्रास झाला होता. त्यामुळे माझ्या उजव्या हाताच्या करंगळीपर्यंतच्या मज्ञातंतू संकुचित झाल्या होत्या. परिणामी माझी करंगळी सुन्न झाली होती व हातालाही सतत मुंग्या येत होत्या. यामुळे मला रात्री झोप लागत नव्हती व प्रचंड वेदना होत होत्या. काही चाचण्या केल्यावर असे लक्षात आले की माझ्या शरीरात खूप आम्ल साचले असल्याने युरिक ऍसिड तयार झाले आहे. मी त्यावेळेस कॅल्शियम व मॅग्नेशियमचा पुरवठा वाढवण्यासाठी गोळ्या घेत होतो पण एवढंच पुरेसं नव्हतं. माझं पोट माझ्या हाडांमधून कॅल्शियम शोषून हाडांना ठिसूळ करत होतं. म्हणूनच इंग्लंड दौऱ्याच्या वेळी मी मांसाहार पूर्ण टाळायचं ठरवलं, आणि खरंच सांगायचं तर मला कधीच इतकं बरं वाटलं नव्हतं. यामुळे माझी ऊर्जा सुद्धा वाढली आहे कोहलीच्या शाकाहारी आहारातून फायदे झाल्याच्या मतावर तज्ज्ञांचं काय मत आहे हे आता आपण जाणून घेऊया. इंडियन एक्सप्रेसने डॉ संतोष पांडे, ॲक्युपंक्चर आणि निसर्गोपचार, रेजुआ एनर्जी सेंटर, मुंबई यांच्याची बोलून शाकाहार व आरोग्य यांचा परस्पर संबंध काय याविषयी माहिती दिली आहे. शिवाय असा निर्णय घेताना आपणही काय काळजी घ्यायला हवी हे सुद्धा डॉ. पांडे यांनी सांगितले आहे.डॉ. पांडे सांगतात की, शाकाहारी आहारात कॅल्शियम भरपूर असू शकते, जे हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. पालेभाज्या, फोर्टिफाइड प्लांट–आधारित दूध आणि टोफू यांसारखे पदार्थ दुग्धजन्य पदार्थांच्या गरजेशिवाय कॅल्शियम देऊ शकतात. शाकाहारी जेवण, विशेषत: पोटॅशियमयुक्त पदार्थ जसे की फळे आणि भाज्या, रक्तदाब कमी



करण्यास आणि उच्च रक्तदाबाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात. संतुलित शाकाहार किंवा वनस्पती–आधारित आहार निवडताना मायक्रो न्यूट्रियंट्स (पोषक सत्वांकडे) लक्ष द्यायला हवे.डए–छ या संस्थेच्या संस्थापक व पोषण प्रशिक्षक सुविधा जैन यांनी सांगितले की जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्ससह आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध शाकाहार आरोग्यसाठी उपयुक्त ठरू शकतो. वनस्पती–आधारित पदार्थांचा समावेश विशेषतः हिरव्या भाज्या, फायबरचे सेवन वाढवते, आतड्यांचे आरोग्य सुधारते आणि पचनास मदत करते.विराट कोहलीने मांसाहार का बंद केला? या आहारांमध्ये संतृप्त चरबीचे सेवन कमी केल्याने कोलेस्टेरॉलची पातळी कमी होऊ शकते, हृदयविकाराचा धोका कमी होतो आणि यातील बहुसंख्य पदार्थांच्या कॅलरीज कमी असल्याने वजन व्यवस्थापन आणि लठ्ठपणा कमी करण्यासाठी मदत होऊ शकते. शाकाहार निवडताना हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की शाकाहारामुळे आरोग्याला अनेक फायदे मिळतात, परंतु प्रथिने, लोह, व्हिटॅमिन बी १२ आणि ओमेगा –३ फॅटी ऍसिडस् यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचे पुरेसे फायदे मिळवण्यासाठी जेवणाचे ताट काळजीपूर्वक ठरवून तयार करायला हवे.

# कर्नाटक काँग्रेसमध्ये कुरबुर?


बंगळूरू : भाजपाचा दारुण पराभव करत काँग्रेसने मोठ्या बहुमतासह कर्नाटकमधील सत्ता मिळवली होती. मात्र राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून काँग्रेसमध्ये सातत्याने कुरबुरी सुरू आहेत. मुख्यमंत्रिपदावरून सिद्धारामैय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यामध्ये सुरू असलेली रस्सीखेच सर्वज्ञात आहे. यादरम्यान, कर्नाटकमधील भाजपाचे युवा नेते तेजस्वी सूर्या यांनी उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेतली आहे. दोन्ही नेत्यांमधील ही भेट राजकीय वर्तुळामध्ये चर्चेचा विषय ठरली आहे. हल्लीच काँग्रेसच्या काही आमदारांनी डी. के. शिवकुमार यांची भेट घेतली होती. तसेच ते मुख्यमंत्री होणार असतील तर आपण पाठिंबा देऊ असे सांगितले होते. मात्र तेव्हा शिवकुमार यांनी अशा प्रकारची कुठलीही शक्यता फेटाळून लावली होती. कर्नाटमधील काँग्रेसचे राजकारण पाहिल्यास सिद्धारमैय्या आणि डी. के. शिवकुमार



यांच्यातील राजकीय चढाओढ ही काही नवी बाब नाही आहे. हल्लीच कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धारमैय्या यांना अडीच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर मुख्यमंत्रिपद सोडणार का, असे विचारण्यात आले होते. त्याला उत्तर देताना सिद्धारमैय्या यांनी मी पूर्ण पाच वर्षे सरकार चालवणार, असे सांगितले होते. सिद्धारमैय्या यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. विधानसभा निवडणुकीवेळी काँग्रेसने सिद्धारमैय्या यांना पुढे करत निवडणूक लढवली होती. मात्र डी. के. शिवकुमार यांनाही पक्षाने तेवढेच महत्त्व दिले होते. कर्नाटकमधील काँग्रेसच्या विजयानंतर जेव्हा शिवकुमार यांना विचारण्यात आले. तेव्हा त्यांनी आमच्यासाठी कर्नाटकमध्ये पक्ष मजबूत होणे, हेच मुख्य लक्ष्य आहे. पदाची महत्त्वाकांक्षा नाही, असे सांगितले होते.लोकसभा निवडणुकीत फटका? जेडीएसने हल्लीच सांगितले होते की, जर डी. के. शिवकुमार यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावेदारी केली तर पक्ष त्यांना पाठिंबा देईल. या विधानाचे वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. कर्नाटकमध्ये भाजपा आणि जेडीएसने एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस सत्तेत असल्याने आपल्याला लोकसभा निवडणुकीत फटका बसू शकतो, याची जाणीव दोन्ही पक्षांना आहे. दरम्यान, भाजपा, जेडीएस आणि शिवकुमार यांच्यामध्ये काही समिकरणे जुळली तर त्याचा फटका काँग्रेसला बसू शकतो.

# गरिबांसाठी चार कोटी घरे बांधली : पंतप्रधान मोदी


इंदूर : मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीपूर्वी सतना येथे एका सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, त्यांच्या सरकारने गरीबांसाठी चार कोटी पक्की घरे बांधली आहेत, परंतु त्यांनी 'स्वतःसाठी एकही घर बांधले नाही. तुमच्या मताने पुन्हा भाजपचे सरकार बनणार आहे. तुमच्या मतामुळे दिल्लीत मोदींना बळ मिळेल. तुमचे मत काँग्रेसला मध्य प्रदेशमध्ये सरकार बनवण्यापासून शंभर मैल दूर ठेवेल. तुमचे एक मत म्हणजे तीन चमत्कार, असे मोदी म्हणाले.



मोदी म्हणाले की, मध्य प्रदेशातील मतदारांचे प्रत्येक मत 'त्रिशक्ती'ने भरलेले आहे, जे भारतीय जनता पक्षाला मध्य प्रदेशात पुन्हा सरकार स्थापन करण्यास, केंद्रात पंतप्रधानांना बळकट करण्यास मदत करेल. राज्यातील सरकार मजबूत करा, काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्यास मदत होईल. काँग्रेसने सरकारी योजनांचे कोट्यवधी बनावट लाभार्थी तयार केले होते, त्यांना केंद्रातील भाजप सरकारने काढून टाकले. पंतप्रधान म्हणाले की, देशात त्यांचे सरकार आल्यानंतर सरकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या काँग्रेसने तयार केलेल्या १० कोटी बनावट लाभार्थ्यांना रेकॉर्डमधून काढून टाकण्यात आले आहे. काँग्रेसकडे मध्य प्रदेशसाठी कोणताही रोडमॅप नाही, तर दुसरीकडे मोदींची हमी म्हणजे आश्वासने पूर्ण करण्याची हमी, असे ते म्हणाले.

# भाजप आमदार आशुतोष टंडन यांचे निधन

लखनौ : भारतीय जनता पक्षाचे (भाजप) लखनौ पूर्व येथील आमदार आशुतोष टंडन यांचे गुरुवारी निधन झाले आहे. मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल लालजी टंडन यांचे ते पुत्र होते. आशुतोष टंडन हे काही दिवसांपासून आजारी होते. आशुतोष टंडन यांनी उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथ सरकारच्या पहिल्या कार्यकाळात शहरी विकास, रोजगार आणि गरिबी निर्मूलन यांसारखी अनेक मंत्रालये हाताळली होती. २०१४ मध्ये त्यांनी लखनौ पूर्व मतदारसंघातून पहिल्यांदा विधानसभा निवडणूक जिंकली. २०२२ मध्ये ते तिसऱ्यांदा या जागेवरून आमदार म्हणून निवडून आले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आशुतोष टंडन यांच्या निधनावर दुःख केले आहे. एक्सवर योगी अधित्यनाथ यांनी म्हटले आहे की,



एक लोकप्रिय, कष्टाळू आणि लढाऊ राजकारणी म्हणून ते नेहमीच स्मरणात राहतील. शोकाकुल कुटुंबीयांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती देवो हीच प्रभू श्री राम चरणी प्रार्थना. योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

# लोकप्रतिनिधींवरील खटले जलदगतीने निकाली काढा

नवी दिल्ली : संसद खासदार आणि विधानसभेतील आमदारांवरील फौजदारी खटले जलदगतीने निकाली काढण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवार दि. ९ नोव्हेंबर रोजी दिले आहेत. खासदार आणि आमदारांविरोधांतील खटले जलदगतीने निकाली काढण्यासंबंधी ट्रायल कोर्टांसाठी एकसमान मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे कठीण होईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.तसेच सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयांना खासदार आणि आमदारांचा समावेश असलेल्या प्रकरणांचे प्रभावीपणे निरीक्षण आणि निपटारा करण्यासाठी सुमोटो तक्रारी नोंदवण्यास सांगितले आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी खासदार आणि आमदारांविरुद्ध प्रलंबित खटल्यांच्या सुनावणीसाठी विशेष पीठ स्थापन करावे, असे आदेश दिले. हे विशेष पीठ मुख्य न्यायमूर्तींच्या




नेतृत्त्वाखाली असावे, असे न्यायालयाने म्हटले आहे. फाशीची शिक्षेची तरतूद असलेल्या खटल्यांना इतर प्रकरणांपेक्षा प्राधान्य द्यावे, असेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत. संबंधित प्रधान सत्र न्यायमूर्तींनी अशा खटल्यांच्या सुनावणीसाठी पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करुन करावी, असे सर्वोच्च न्यायालयाने पुढे म्हटले आहे.आजीवन बंदीच्या मागणीवर विचार? विद्यमान लोकप्रतिनिधींसह दोषी राजकारण्यांवर निवडणूक लढविण्यास आजीवन बंदी घालण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. न्यायालयाने यावर निर्णय दिला नसला तरी यासंबंधित खटले जलदगतीने निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत. आजीवन बंदीच्या मागणीवर नंतर विचार केला जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सहा वर्षांची बंदी हटविणार? अश्विनीकुमार उपाध्याय यांनी लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ (आरपी ॲक्ट) च्या कलम ८ (३) अंतर्गत सहा वर्षांची बंदी हटवण्याची आणि आजीवन बंदी घालण्याची मागणी केली आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने खासदार, आमदारांवरील फौजदारी खटले जलदगतीने निकाली काढण्याचे निर्देश दिले आहेत.

# जिल्ह्यात महसूल, शिक्षण, भूमीअभिलेख विभागाकडून कुणबी नोंदी तपासण्याचे काम युद्धपातळीवर सुरु

लातूर दि.९ ( जिमाका ) लातूर जिल्ह्यातील कुणबी नोंदी शोधण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या सूचनेनुसार महसूलचे सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तहसीलदार, शिक्षण विभागाचे गट शिक्षण अधिकारी, तालुका भूमीअभिलेख अधिकारी यांनी युद्ध पातळीवर काम सुरु केलं आहे. जबाबदारीचे वाटप केल्यामुळे नोंदी शोधण्याच्या कामाला गती आली आल्याचे अपर जिल्हाधिकारी सुनील यादव यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील दहाही तालुक्यात यंत्रणा कामाला लागली असून ज्या ज्या विभागाकडे १९६८ पूर्वीच्या नस्ती आहेत, त्या तपासल्या जात आहेत.१९४८ पूर्वीच्या नोंदी मोडी अथवा उर्दू मध्ये असल्यामुळे लिप्यांतर तज्ज्ञ सोबत घेऊन अत्यंत बारकाईने या नोंदी तपासल्या जात आहेत. त्यासाठी विशेष अधिकारी नियुक्त केले आहेत. जिल्हा स्तरावरूनहीं काही अधिकारी तालुक्याच्या ठिकाणी गेले आहेत. रोजच्या रोज या कामाचा आढावा जिल्हाधिकारी घेत असल्यामुळे या कामाला मोठी गती आली आहे. जिल्ह्यातील ज्या शाळा जुन्या आहेत त्यांचे निर्गम उतारे बघितले जात असून त्यासाठी शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी तालुका शिक्षण अधिकारी यांना तज्ञ लोकांची टीम करून या नोंदी तपासणीचे आदेश दिले आहेत. त्यांच्याहीं टीम त्या त्या शाळेत जाऊन या नोंदी तपासत असल्याचेही अपर जिल्हाधिकारी सुनील यादव यांनी सांगितले. भिसे वाघोली येथे झाली विशेष ग्रामसभा लातूर तालुक्यातील भिसे वाघोली येथे ४५ कुणबी नोंदी आढळून आल्या होत्या. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या



आदेशावरून उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी या गावात ८ नोव्हेंबर रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करून थेट गावात जाऊन कागदपत्र पडताळणी गेली काल १५ लोकांच्या ऑनलाईन नोंदी करून घेतल्या बाकी नोंदी तपासण्याचे काम ९ नोव्हेंबर रोजीहीं सुरु असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

# मिठाईला ॲल्युमिनियमचा वर्ख!

लातूर : एजाज शेख दिवाळीनिमित्त बाजारपेठेत मिठाईची असंख्य दुकाने थाटण्यात आलेली आहेत. मिठाई आकर्षक दिसावी, मिठाई शाही दिसावी, ग्राहकांच्या पसंतीला ती उतरावी, याकरीता बहुतांश मिठाईला चांदीचा वर्ख लावला जातो. ख–या चांदीचा वर्ख दिसण्यात मलुल व मिठाईत मिसळल्यासारखा दिसतो. पण ॲल्युमिनियमचा वर्ख चमकत राहातो व त्याचे वेगळे अस्तित्व जाणवते. मिठाईला चांदीऐवजी ॲल्युमिनीयचा वर्ख लावला जात असेल तर ती ग्राहकांची फसवणुक नव्हे काय?, हा प्रकार अन्नभेसळीचा नव्हे काय?, जर असेल तर मग अन्न व औषध प्रशासनाकडे याविरुद्ध कार्यवाही का नाही?, असे अनेक प्रश्न सध्यातरी निरुत्तरीत आहेत. महागामोलाच्या चांदीचा वर्ख मिठाईला लावून ८०० ते ९०० रुपये किलो दराने विक्री करणे कसे परवडत असेल. जर हे परवडत नसेल तर मिठाईवरील तो वर्ख चांदीचा आहे की, अल्युमिनीयमचा याचा शोध घेणार कोण?, हा आखणी एक प्रश्न ग्राहकांना पडला आहे.काळानुरुप मिठाईमध्ये बदल होत गेले. जेवणात एखादातरी गोड पदार्थ हमखास असतोच. त्यामुळे सर्वांना गोड पदार्थ हवाहवासा वाटतो. अगदी मधुमेहींनासुद्धा. परंतू, मिठाई खाताना कशाचीही तमा न बाळगता केवळ तोंड गोड झाले, यावर आपण समाधान मानत असतो. मात्र मिठाईत वापरण्यात आलेला चांदीचा वर्ख हा विषाचा अर्क आहे, याकडे आपले लक्षही नसते. म्हणून मिठाई खाताना जरा सांभाळूनच खाल्ले तर भविष्यात होणारे शारिरीक गंभीर परिणाम रोखता येतील.शहरात कुठेही जा, मिठाईच्या दुकानातून नामवंत मिठाईवाले मिठाई अधिक आकर्षक दिसावी म्हणून मिठाईत चांदी वर्खचा वापर करतात. आकर्षक आणि पटकण डोळ्यात भरणारी ही मिठाई आरोग्याच्या दृष्टीने किती उपयुक्त आहे, याचा कोणीच विचार करीत नाही. मात्र काही माणसं खुप चिकित्सक असतात. अशा माणसांपैकीच एकाने मिठाईमध्ये वापरण्यात येत असलेला चांदीचा वर्ख, आरोग्यासाठी घातक आहे, यावर प्रतिबंधक घालावा, अशी मागणी केली आहे. परंतू त्या मागणीकडे अद्यापतरी गांभीर्याने पाहिले गेलेले नाही हे विशेष. साधारणत: मॅगो बर्फी, अंजीर बर्फी, गुलकंद बर्फी, सॅन्डवीच बर्फी, मलाई बर्फी, मोतीचूर लाडू, काजू कतली, म्हैसुरपाक, बदाम कतली, रोझ कतली, अंजीर कतली, काजू रोल, अंजीर रोल, पिस्ता कतली आदी मिठाईला चांदी वर्ख लावलेला असतो.आज एक किलो चांदीसाठी लाखभर रुपये मोजावे लागत असताना या चांदीचा वापर मिठाईत करणे हे मिठाईवाल्यांना कसे परवडते? हा खरा प्रश्न आहे. खरे तर मिठाईला चांदीचा वर्ख लावणे मिठाईवाल्यांना अजिबात परवडत नाही, म्हणून मिठाईला ॲल्युमिनियम सारख्या हलक्या धातूचा वर्ख लावण्यात येत असलयाचे विश्वासनीय वृत्त आहे. तशी चर्चाही असते परंतू, या विषयी कोणी उघडपणे बोलण्यास पुढे येत नाही. चांदी किंवा ॲल्युमिनियम हे दिसायला एकसारखेच असल्यामुळे आणि याचा मिठाईतील वापर अत्यंत मर्यादीत स्वरुपाचा असल्यामुळे या गोष्टीची फारशी चिकित्सा होत नाही. असे असले तरी ॲल्युमिनियमचा वापर खाण्यात वारंवार होऊ लागला तर पोटाचे, आतड्याचे किंवा किडनीचे विकार संभवतात. त्यामुळे मिठाई खाताना थोडी काळाजी घेतलेलीच बरी.

# बुद्धगया येथे थायलंडने दिले सोन्याचे पाईप

बुद्धगया मधील जो बोधीवृक्ष आहे, त्यांच्या फांद्याला सपोर्ट म्हणुन लोखंडी पाईप होते... थायलंड देशातील उपासकांनी सोन्याचे पाईप दान करून .... सपोर्ट म्हणून सोन्याचे पाईप लावण्यात आले आहेत.



# बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ७३५ वतीने वर्षावास प्रवचन मालिका सांगता समारंभ उत्साहात संपन्न

पनवेल :- बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ७३५ संलग्न आम्रपाली महिला मंडळ, सुकापूर, कोप्रोली, आकुर्ली, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शाखा क्र. ७३५ चे उपाध्यक्ष, सम्यक कोकण कला संस्थेचे कायदेशीर सल्लागार, कालकथित शिवराम पवार उर्फ चित्तरंजन पवार यांचे सुपुत्र सुबोध शि. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मचक प्रवर्तन दिन व वर्षावास प्रवचन मालिका सांगता समारंभ दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी २:०० वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष व कलावंतांचे मार्गदर्शक मा. लक्ष्मणजी भगत प्रमुख पाहुणे म्हणून तसेच सम्यक कोकण कला संस्थेचे कार्याध्यक्ष व रिपब्लिकन सेना मुंबई, दक्षिण विभागाचे अध्यक्ष मा. भगवान साळवी सपत्नीक उपस्थित होते, सदर कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा गट क्र. ५७ चे गटप्रतिनिधी प्रमोद सावंत यांनी सांभाळली तर चंदू कांबळे यांनी अत्यंत प्रभावी शैलीत प्रास्ताविक सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सदर प्रसंगी सम्यक कोकण कला संस्थेचे अध्यक्ष कवी गायक मंदार कवाडे, उपाध्यक्ष कवी गायक मुकुंद तांबे, सिनेपार्श्वगायक संगीतकार विनोद धोत्रे, कोषाध्यक्ष सुभाष सावंत, मोहन थोरात यांच्या उपस्थितीत सम्यक कोकण कला संस्थेच्यावतीने गाण्यातून मनोरंजन... गाण्यातून प्रबोधन... प्रबोधनातून मनोरंजन... हा भूतो न भविष्यती असा भीमबुद्ध गीतांचा कार्यक्रम



मोठ्या दिमाखात सादर करण्यात आला, सचिव नरेश शिंदे यांच्या वंदन गीताने सदर कार्यक्रमाला सुरुवात झाली तर विजय पवार बोरघरकर यांच्या धर्मांतर विषयावरील गीताने रसिकांची मने जिकून घेतली तसेच गायक रघुनाथ मोरे, शरद मोहिते, मीनाक्षी थोरात, कमल म्हस्के, विजय जाधव, विजय पवार मांडकीकर यांनी ही आपल्या सुमधुर गीतांनी रसिकांच्या मनावर भुरळ घातली, सरतेशेवटी कालकथित चित्तरंजन पवार यांचे शिष्य अशोक जगताप यांच्या गीताने गीत-गायन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर प्रसंगी कालकथित महाकवी चित्तरंजन पवार यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र सुबोध पवार यांनी सम्यक कोकण कला संस्थेचा डिजिटल बॅनर त्यांनी संस्थेला प्रदान केला. शेवटी अध्यक्ष सुरेश कांबळे यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या शाखा क्र. ७३५ व आम्रपाली महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# झाडांना खिळे मारल्यास होणार कारवाई-मनपाचा इशारा

लातूर ;प्रतिनिधी: आपल्या व्यवसायाच्या जाहिराती झाडांवर लावण्यासाठी व्यवसायिक यांच्याकडून झाडांना खिळे मारणे, पत्र्याच्या पाट्या मारणे, झाडांवर लायटिंग करणे आदी प्रकार शहरात दिसून येत आहेत. झाडांना खिळे अथवा लोखंडी पाट्या मारणे ही बाब गंभीर असून यापुढे झाडांना खिळे मारल्यास दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या संदर्भात लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानने मनपा आयुक्त यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे. आपल्या क्लासेस, व्यवसाय आणि इतर आस्थापना यांच्या जाहिराती झाडांवर लावण्याचे प्रकार शहरात वाढले आहे. जाहिराती लावण्यासाठी झाडांना खिळे मारणे, लोखंडी पाट्या ठोकणे, बोर्ड लावणे, लायटिंग करणे आदी गंभीर प्रकार दिसून येत आहेत. झाडांना खिळे मारल्याने झाडांची वाढ खुंटते, या संदर्भात लातूर मनपाच्या वतीने व्यावसायिकांना आवाहन करण्यात येते की, १५ दिवसांच्या आत झाडांवर लावलेले फलक स्वतःहून काढून घ्यावेत. जे व्यावसायिक १५ दिवसात झाडांवर लावलेले फलक काढणार नाहीत, त्या जाहिरात करणा-यावर दंडात्मक



आणि कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# व्हि. डी. एफ. स्कुल ऑफ फार्मसी, लातूर या महाविद्यालयात 'आविष्कार -२०२४' चे आयोजन.

लातूर : विलासराव देशमुख फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स व्हि.डी.एफ.स्कुल ऑफ फार्मसी, लातूर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आविष्कार २०२४ हा उपक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेयांच्या विद्यमाने आयोजीत करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. मोहन बुके (व्हि.डी.एफ.स्कुल ऑफ इंजिनीअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, लातूर ), प्राचार्या, डॉ. सुद मॅडम ( गोल्डकिस्टहाय लातूर ), प्राचार्य प्रा. साखरे सर (व्हि.डी.एफ. स्कुल ऑफ पॉलीटेक्नीक, लातूर ) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बालाजी वाकुरे उपस्थित होते. शैक्षणिक संशोधन हा एक महत्वाचा घटक मानला जातो. त्याला अनुसरून 'अविष्कार २०२४ हा कार्यक्रम संपन्न झाला. याचे मुख्य उध्दिष्टे विद्यार्थ्यांच्या लपलेल्या नाविन्यपुर्ण वैज्ञानिक कलागुणांची आणि क्षमतांची ओळख करून देणे आणि त्यांना संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे. तसेच गुणवत्ता वाढविण्यासाठी संशोधकामध्ये स्पर्धात्मकता निर्माण करणे व संशोधन आणि संशोधकाचे कौतूक करणे तसेच फेलोशिपच्या स्वरुपात आर्थिक मदत देणे जेनेकरुन संशोधनाला चालना मिळते. त्यासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध अभ्यासक्रमासहीत मानवता भाषा आणि



ललीत कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, विज्ञान, कृषी आणि पशुसंवर्धन, अभियांत्रीकी आणि तंत्रज्ञान, औषध आणि औषधनिर्माणशास्त्र या श्रेणीमध्ये भाग घेतला. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पोस्टर व्दारे सादरीकरण केले. महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धेतून प्रत्येक श्रेणीमधून प्रथम आणि व्दितीय क्रमांक मिळवलेले बारा विद्यार्थी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले. या स्पर्धे साठी परिक्षक प्रा. रनहेर एस.एस., प्रा. साळुंके एम. ए., प्रा. गादा एस. एन. यांनी काम पाहीले. महाविद्यालयीन स्तरावर निवडलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देउन सन्मानित करण्यात आले व विभागीय स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. उन्नती खरे यांनी केले व कार्यक्रम समन्वक प्रा. उटीकर मोक्षदा, प्रा. जाधव स्नेहा यांच्यासह या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# आंबेडकर विधी महाविद्यालयात अंनिस चा राज्यव्यापी कार्यक्रम संपन्न

मुंबई :- डॉ .आंबेडकर विधी महाविद्यालय वडाळा मुंबई येथे अंनिस महाराष्ट्र द्वारे आयोजित जादूटोणा वअघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा २०13 बाबत जनजागृती आणि विधी महाविद्यालयातीलविद्यार्थ्यांना या कायद्यातील तरतुदींची माहिती व्हावी यासाठीकार्यक्रमाचे आयोजन करण्यातआले होते. कार्यक्रमाची माहिती देताना दिवंगत डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या कन्या मुक्ता दाभोळकर यांनी विशेष मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.यशोधरा वराळे मॅडम उपस्थित होत्या देवदासी प्रथेविरुद्ध लढाऊ वृत्तीनेकार्य करणाऱ्या रणरागिनी नंदिनी जाधव यांनी या कायद्यातील विविध तरतुदी आणि कायदेविषयक बाबी समजावून




सांगितल्या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रो. सुभाष चंद्र ,अंधश्रद्धा निर्मूलनवार्ता पत्राचे संपादक राजीव देशपांडे,अंनिस कार्यकर्ते भगवान रणदिवे, रमेश साळुंके,अनंत पवार , बेडेकर सर, पगारे सरआणि बहुसंख्य विद्यार्थी वर्ग उपस्थित होता कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नितीन पवार ,संजय गमरे ,जयेश सातपुते तसेच वडेराव इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणिआभार प्रदर्शन मधुकर वारभुवन यांनी केले.

# डॉ. संतोष मुंडे यांनी दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे घेतले कामकाज समजुन

मुंबई (प्रतिनिधी) दिव्यांगांच्या सेवेसाठी अभियानचे उपाध्यक्ष हे पद माझ्यासाठी खुप महत्वाचे आहे. पदाला न्याय देण्यासाठी मी वचनबद्ध असुन दिव्यांगांसाठी आयुष्य खर्ची घालणार असल्याचे प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी केले. मुंबईच्या कार्यालयात अधिकारी, कर्मचारी व दिव्यांगांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

डॉ. संतोष मुंडे यांनी आज मुंबई येथे दिव्यांग स्वतंत्र मंत्रालय मित्तल टॉवर नरिमन पॉईंट येथे ऑफिसला भेट देऊन कामकाज समजून घेतले. यावेळी दिव्यांग विभागाचे प्रधान सचिव अभय महाजन, आयुक्त घोडके यांनी त्यांचे स्वागत करून



कामकाजाचे स्वरूप व उद्दिष्टांबाबत सविस्तर माहिती दिली. सातत्याने ना. धनंजय मुंडेंच्या यांच्या नेतृत्वाखाली समाजातील दिव्यांग, निराधार, विधवा आदी वंचित घटकांना न्याय मिळावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आ. बच्चूभाऊ कडू यांनी माझ्यावर एवढी मोठी जबाबदारी टाकली असल्याचे सांगुन आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळत असल्याने आपण समाधानी आहोत असेही ते म्हणाले. गेल्या पंधरा वर्षापासुन मी डॉक्टर व्यवसायाच्या माध्यमातुन सामाजिक कार्यात आहे. दिव्यांगांसाठी काम करताना अनेक अडचणी आल्या पण शेवटच्या दिव्यांगाला न्याय मिळावा ही आपली भूमिका असुन त्यासाठीच आपण काम करत आहोत. नवीन जबाबदारीमुळे आणखी कामाची व्याप्ती वाढून मला जास्तीत जास्त दिव्यांगांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे असे सांगुन या कामामध्ये या विभागातील सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन डॉ. संतोष मुंडे यांनी केले.

# विशेष मतदार नोंदणी शिबिरामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी जिल्ह्यात अडीच हजार अर्ज प्राप्त

लातूर, दि. ९ (जिमाका): भारत निवडणूक आयोग व मुख्य५ निवडणूक अधिकारी यांच्या शिफारसीनुसार १ जानेवारी २०२४ या दिनांकावर आधारित मतदार याद्यांचे संक्षिप्तआ पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत नागरिकांकडून दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. या अंतर्गत मतदार नोंदणीचे, मतदार यादीतील नोंदींच्या दुरुस्ती वा वगळणीचे अर्ज स्वीकारण्यासाठी ४ नोव्हेंबर आणि ५ नोव्हेंबर रोजी सर्व मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यात अडीच हजार नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदणीसाठी नमुना क्र. ६ अर्ज केले आहेत. मयत अथवा दुबार अथवा कायम स्थहलांतरीत असल्यांमुळे मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी १८३ जणांनी नमुना नं. ७ भरून दिला आहे. मतदार यादीतील तपशीलात दुरुस्ती३, पत्तात बदल, मतदान ओळखपत्र हरविल्याने ४९६ व्यक्तींनी अर्ज नमुना नं. ८ भरून दिला आहे. तसेच ४५ दिव्यांग बांधवांनी नवीन नोंदणीसाठी अर्ज केला आहे, तर १०२ दिव्यांग बांधवांनी अर्ज नमून क्र. ८ भरून दिला आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ४६९, लातूर शहर विधानसभा मतदारसंघात ४८३, अहमदपूर मतदारसंघात ३२३, उदगीर मतदारसंघात ४४९, निलंगा मतदारसंघात ४२१ आणि औसा मतदारसंघात ४०७ अर्ज दाखल झाले आहेत. तसेच मतदार यादीतून नाव वगळणे आणि मतदार यादीतील तपशील दुरुस्तीसाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात १३२, लातूर शहर विधानसभा मतदारसंघात २१५, अहमदपूर मतदारसंघात ४५, उदगीर मतदारसंघात १२९, निलंगा मतदारसंघात १२७ आणि औसा मतदारसंघात २७ अर्ज दाखल झाले आहेत. मतदार याद्यांचे संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत नागरिकांकडून दावे व हरकती स्वीकारण्यासाठी शनिवार, २५ नोव्हेंबर आणि रविवार, २६ नोव्हेंबर रोजीही विशेष मतदार नोंदणी शिबीर सर्व मतदान केंद्रांवर आयोजित करण्यात येणार असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुचिता शिंदे यांनी कळविले आहे.

# अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या बचतगटांना मिळणार मिनी ट्रॅक्टर

लातूर (जिमाका):- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्यात येतो. २०२४ वर्षामध्ये या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र बचत गटांनी ५ डिसेंबर २०२३ पर्यंत आपले अर्ज समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयात सादर करावेत, आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी केले आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना ८ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या ु.ारहरीरीहीर. सीं.ळप या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. तरी जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांनी या योजनेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त चिकुर्ते यांनी केले आहे.

# आधुनिक नक्षीदार पणत्यांना सर्वाधिक मागणी

लातूर : प्रतिनिधी दीपावली आता सुरु होत असल्याने बाजारपेठेत विविध खरेदीसाठी महीलानी एकच गर्दी केली आहे. लक्ष लक्ष दिव्यांनी आसमंत उजळून टाकणा-या दिव्यांच्या असंख्य प्रकारांनी पणत्यानी शहरातील बाजारपेठ सजली आहे. ग्राहकांच्या पसंतीस उतरण्यासाठी पारंपरिक दिव्यांबरोबरच आधुनिक एथनिक टच दिलेल्या शेकडो प्रकारच्या पणत्या व दिवे बाजारपेठेत दाखल झाले आहेत.स्वस्तिक, पाने, फुले, चांदण्या अशा वैविध्यपूर्ण आकारातील पणत्यांसह कुंदन प्रकरातील कलाकुसर केलेल्या आणि नक्षीदार पणत्या बाजारपेठेत महिलांसाठी आकर्षण ठरत आहेत. दिवाळीमध्ये सर्वाधिक महत्त्व दिले जाते ते पणत्यांना. खरे तर वसुबारसेपासूनच दिवाळी या दीपोत्सवाला सुरुवात होते, आणि बघता बघता या पणत्यांमुळे घराचे अंगण प्रकाशाने उजळून जाते. मंगलमय वातावरणात रंग भरणा-या दिव्यांमध्ये गतवर्षीप्रमाने नवनवीन प्रकार बघायला मिळतात. काही वर्षांपूर्वी कुंभारवाडयात एकाच साच्यातून तयार होणा-या पारंपरिक पणत्याच बाजारपेठेत पाहायला मिळत होत्या. मात्र हळूहळू मेणाच्या, काचेच्या पणत्यांचा यात भर पडली आहे. कालांतराने कारागिरांनी विविध प्रकारच्या नक्षीदार पणत्या करायला सुरुवात केली. या पणत्यांनाही ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यानंतर कुंदन, मोती आदी गोष्टींनी सजवलेल्या पणत्याही बाजारात उपलब्ध झाल्या. या पणत्यांना उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे किरकोळ व्यापारी पारबती भागवत राजे यांनी सागीतले.बाजारपेठेत या वर्षी स्वस्तिक, फुले, पाने, चांदण्या, नक्षीकाम केलेल्या रंगीत आणि साध्या मातीच्या पणत्या उपलब्ध आहेत. शहरात विक्रिसाठी येणा-या पणत्या राज्यस्थान, मुंबई, गुजरात, अहमदाबाद, सोलापुर येथून हा सर्व माल मागवला गेला असल्याचे होलसेल व्यापारी राम कुभार योनी सागीतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE